**शिक्षण मंडळ, कराडचे.**

# यशवंत व्यासपीठ

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२४-२०२५

मा. सेक्रेटरी,
शिक्षण मंडळ, कराड.
**प्रशासकीय कार्यालय –''कृष्णाकाठ'' फा. प्लॉट क्र. २२२, मंगळवार पेठ, कराड –४१५११०**

**विषय – शाळेतर्फे राज्यस्तरीय वक्तृत्त्व स्पर्धेसाठी प्रवेश पत्रिका पाठविणेबाबत**

महाशय,

आमच्या ____________________________________________

या विद्यालयाद्वारे खाली दर्शविलेले विद्यार्थी आपल्या संस्थेच्या विद्यमाने संपन्न होणाऱ्या '' **यशवंत व्यासपीठ** '' द्वारा आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत भाग घेणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक स्पर्धकास प्रवेश मूल्य रु. १००/– (रुपये शंभर) रोख किंवा संस्थेच्या **बँक ऑफ बडोदा शाखा कराड खाते क्र. ३१०९०१००००२२२४** या खात्यावर भरण्यात आले आहेत व त्याची पावती सोबत जोडली आहे.

स्पर्धेतील सहभागी स्पर्धक हे इयत्ता आठवी, नववी किंवा दहावी इयत्तेत शिकत आहे.

| अ. नं. | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव | इयत्ता | पालकाचा मोबाईल क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

शाळेचा email :____________________________

संबंधित शिक्षकाचे नांव : ____________________________

मोबाईल नंबर : ____________________________

दिनांक : / / २०२

**आपला,**

**मुख्याध्यापक**
**सही व शाळेचा शिक्का**

**शिक्षण मंडळ, कराड.**

# राज्यस्तरीय कथा - कथन स्पर्धा २०२४-२०२५

## स्व. शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी यांच्या स्मरणार्थ व लाहोटी कुटुंबियांच्या सौजन्याने

मा. सेक्रेटरी,

शिक्षण मंडळ, कराड.

**प्रशासकीय कार्यालय –''कृष्णाकाठ'' फा. प्लॉट क्र. २२२, मंगळवार पेठ, कराड –४१५११०**

**विषय – राज्यस्तरीय कथा – कथन स्पर्धेसाठी प्रवेश पत्रिका पाठवणेबाबत.**

महाशय,

आमच्या ____________________________________________

या विद्यालयाद्वारे खाली दर्शविलेले विद्यार्थी आपल्या संस्थेच्या विद्यमाने संपन्न होणाऱ्या राज्यस्तरीय **''कथा – कथन ''** स्पर्धेत भाग घेणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांचे प्रवेश मूल्य प्रत्येक स्पर्धकास रु. १००/– (रुपये शंभर) रोख किंवा संस्थेच्या **बँक ऑफ बडोदा शाखा कराड खाते क्र. ३१०९०१००००२२२४** या खात्यावर भरण्यात आली आहे. सोबत त्याची पावती जोडली आहे.

विद्यार्थी कुमार गटामधील असून ते पाचवी, सहावी, सातवी इयत्तेत शिकत आहे.

| अ. नं. | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव | इयत्ता | पालकाचा मोबाईल क्रमांक | कथेचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

शाळेचा email :________________________

संबंधित शिक्षकाचे नांव : ________________________

मोबाईल नंबर : ________________________

दिनांक :      /      / २०२

**आपला,**

**मुख्याध्यापक**

**सही व शाळेचा शिक्का**

सर्वं हि तपसा साध्यम् । मनु.

# शिक्षण मंडळ, कराड.

प्रशासकीय कार्यालय - ''कृष्णाकाठ'' फा. प्लॉट क्र. २२२, मंगळवार पेठ, कराड. ४१५११०.

## राज्यस्तरीय कथा - कथन स्पर्धा २०२४ - २०२५

## माहिती पत्रक

कराड नगरीचे दानशूर सुपुत्र स्व. शेठ. रामबिलास किसनलाल लाहोटी यांच्या स्मरणार्थ व कै. श्रीमती रुक्मिणीबाई लाहोटी पुरस्कृत कुमारगटामधील विद्यार्थ्यांसाठी कथा - कथन स्पर्धेचे प्रतिवर्षी आयोजन करताना शिक्षण मंडळ, कराड या संस्थेला अत्यंत आनंद होत आहे. कुमार गटामधील विद्यार्थ्यांचा कथा- कथनाद्वारे त्यांचेमधील निसर्गदत्त गुणांचा विकास व्हावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे, निकोप स्पर्धात्मक वातावरणात गुणी विद्यार्थ्यांचा शोध घ्यावा या हेतुने राज्य पातळीवरील या स्पर्धेचे आयोजन केले जाते.

आपल्या विद्यालयाने या स्पर्धेत सहभागी व्हावे, स्पर्धेच्या तयारीस पुरेसा वेळ मिळावा म्हणून हे माहिती पत्रक बरेच अगोदर पाठविले आहे. स्पर्धेस विद्यार्थी पाठविताना त्याची उत्तम तयारी असावी. आपल्या विद्यालयात संबंधित कथेची चाचणी स्पर्धा घेऊन त्यातून निवडलेले पहिले दोनच विद्यार्थी स्पर्धेसाठी पाठवावेत म्हणजे स्पर्धा गुणवत्तापूर्ण होईल.

### कथा - कथन स्पर्धेचा विषय

## कारगील विजय - युद्ध कथा

**( कोणतीही एक )**

स्पर्धेसाठी वेळ किमान आठ मिनिटे व कमाल दहा मिनिटे असेल खालील निकषावर आधारीत १०० गुण दिले जातील.

**१) कथेची निवड** **२) आत्मविश्वास** **३) वक्तृत्व** **४) कथेशी एकरुपता**
**५) अभिनय** **६) सभाधीटपणा** **७) श्रोत्यांचा प्रतिसाद** **८) भाषा शैली**
**९) वेळ** **१०) कथेचा परिणाम**

- **स्पर्धेचे नियम -**

१) प्रत्येक शाळेतून कुमार गटामधील म्हणजेच इयत्ता पाचवी, सहावी व सातवी या वर्गातील मिळून फक्त दोन विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये सहभागी होता येईल.

२) प्रथम तीन क्रमांकांना अनुक्रमे रु. ४,५०१/-, रु. ३,००१/- व रु. २,००१/- अशी रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे दिली जातील. तसेच उत्तेजनार्थ रोख रू. २५१/- ची ४ पारितोषिके दिली जातील.

३) स्पर्धकांच्या संख्येनुसार व गुणवत्तेनुसार उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येतील.

४) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

५) प्रथम क्रमांक संपादन करणाऱ्या विद्यालयास कायम स्वरूपी स्मृतिचिन्ह दिले जाईल.

६) स्पर्धकास फक्त एकच कथा मराठी भाषेतून सांगता येईल.

७) नियोजित वेळेमध्ये कथा संपली पाहिजे. किमान आठ मिनिटे व कमाल दहा मिनिटे या अधिकृत वेळेत संपणारी कथा बक्षिसासाठी पात्र समजली जाईल.

( मागे पहा )

८) कथेची तयारी केली असली तरी नुसते पाठांतर असू नये. कथेच्या विषयाचे विद्यार्थ्यास आकलन झालेले असावे.

९) स्पर्धेसाठी अधिकृत असणाऱ्या फॉर्मवरच विद्यार्थ्यांची नावे मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने पाठविली पाहिजेत. प्रत्येक स्पर्धकांसाठी प्रवेश फी रु. १००/- (शंभर) राहील. प्रवेश फी रोखीने अथवा संस्थेच्या **बँक ऑफ बडोदा, शाखा- कराड खाते क्र. ३१०९०१००००२२२४** (IFSC Code - BARB0KARADX) या खात्यावर भरण्यात यावी व फी भरल्याची पावती प्रवेशिकेसोबत पाठवावी.

१०) स्पर्धेसाठी संयोजकांनी ठरविलेले सर्व नियम स्पर्धकावर बंधनकारक राहतील.

११) प्रवेश पत्रिका वेळतच आल्या पाहिजेत. वेळेवर न पोहोचणाऱ्या प्रवेश पत्रिका रद्द ठरविल्या जातील. त्या स्पर्धकांना स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

१२) प्रवेश पत्रिका स्विकारण्याची अंतिम तारीख **दि. ३० सप्टेंबर २०२४** ही राहील.

१३) स्पर्धा स्व. शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशाला, कराड येथे होतील. स्पर्धेची प्रवेश पत्रिका शिक्षण मंडळ, कराड या कार्यालयाकडे पाठवावी.

१४) प्रवास, निवास, भोजन व इतर अनुषंगिक खर्च त्या त्या शाळेने करावयाचा आहे.

१५) स्पर्धेपूर्वी स्पर्धकाने आपल्या संबंधित शिक्षकासह दहा मिनिटे अगोदर स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित असले पाहिजे.

आपल्या विद्यालयामधील विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा व आपण तशी संधी त्यांना उपलब्ध करुन द्यावी ही विनंती.

आपल्या प्रवेशपत्रिका आल्यानंतर आपणास स्पर्धेची निश्चित तारीख व वेळ स्वतंत्र पत्राने कळविली जाईल.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता -**
**सेक्रेटरी,**
**शिक्षण मंडळ, कराड.**
प्रशासकीय कार्यालय -''कृष्णाकाठ'' फा. प्लॉट क्र. २२२,
मंगळवार पेठ, कराड. (जि. सातारा) ४१५११०.
फोन नं.- (०२१६४) २२३४०७
email : shikshanmandalkaradk@gmail.com

**चंद्रशेखर देशपांडे**
सेक्रेटरी
शिक्षण मंडळ, कराड.

Book -Post

**श्री.** ______________________

______________________

______________________

• प्रेषक •

**सेक्रेटरी, शिक्षण मंडळ, कराड**

**पत्ता : ''कृष्णाकाठ'' फा. प्लॉट क्र. २२२, मंगळवार पेठ,**

**कराड. ४१५११०.(जि. सातारा)**

**महाराष्ट्र**

सर्वं हि तपसा साध्यम् । मनु.

# शिक्षण मंडळ, कराड.

**प्रशासकीय कार्यालय - ''कृष्णाकाठ'' फा. प्लॉट क्र. २२२, मंगळवार पेठ, कराड. ४१५११०.**

# राज्यस्तरीय यशवंत व्यासपीठ

## माहिती पत्रक २०२४ - २०२५

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे नाव राज्याच्या सांस्कृतिक इतिहासात व भारताच्या राजकीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल असे त्यांचे कर्तृत्व होते.

स्व. यशवंतरावजींच्या व्यक्तिमत्वाला अनेक पैलू होते आणि त्या पैलूंमुळेच त्यांचे व्यक्तिमत्व विलोभनीय झाले होते. त्यांचे नेतृत्व सर्व स्तरात रुजले व विस्तारले होते. अशा व्यक्तिमत्वाचा विद्यार्थ्यांनी डोळसपणे अभ्यास करावा व भावी महाराष्ट्राची जडण - घडण करण्यात विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या हेतूने शिक्षण मंडळ, कराडने **'यशवंत व्यासपीठ'** स्थापन केलेले आहे.

स्व. यशवंतरावजी चव्हाण हे शिक्षण मंडळाच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत असताना त्यांनी वक्तृत्व कलेची साधना केली. मोठेपणी यशवंतरावजींनी अत्यंत चित्तवेधक व मोहक असे वक्तृत्व संपादन केले. सर्वांच्या अंत:करणाला स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वक्तृत्वात होते. त्यादृष्टीने उत्कृष्ट वक्ते निर्माण व्हावेत, जे उत्कृष्ट वक्ते आहेत त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी शिक्षण मंडळ कराडच्या यशवंत व्यासपीठातर्फे महाराष्ट्र राज्य पातळीवर शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा प्रतिवर्षी आयोजित केली जाते.

आपल्या विद्यालयाने या स्पर्धेत सहभागी व्हावे, स्पर्धेच्या तयारीस पुरेसा वेळ मिळावा म्हणून हे माहिती पत्रक बरेच अगोदर पाठविले आहे. स्पर्धेस विद्यार्थी पाठविताना त्यांची उत्तम तयारी असावी. आपल्या विद्यालयात संबंधित विषयांची चाचणी स्पर्धा घेऊन त्यातून निवडलेले पहिले दोन विद्यार्थी स्पर्धेसाठी पाठवावेत म्हणजे स्पर्धा गुणवत्तापूर्ण होईल.

## • स्पर्धेसाठी विषय •

**१. भारताची ऑलिंपिक स्पर्धेतील यशोगाथा**

**२. जगातील अराजकता तिसऱ्या महायुद्धाकडे वाटचाल करीत आहे काय ?**

**३. स्व. यशवंतराव चव्हाण यांचे मराठी साहित्यातील योगदान**

---

स्पर्धेसाठी वेळ किमान आठ मिनिटे व कमाल दहा मिनिटे असेल. आशय, अविष्कार, अभ्यास, नैसर्गिकता, विद्यार्थ्याचे चिंतन आणि एकूण परिणाम यांचा विचार केला जाईल.

### ● स्पर्धेचे नियम -

१) प्रत्येक शाळेतून इ. ८वी, इ. ९ वी व इ. १० या वर्गातील मिळून एकूण दोनच विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी पाठविता येईल.

२) नियोजित वेळेमध्ये भाषण संपले पहिजे. वेळत संपणारे भाषण (कमाल, किमान) पारितोषिकासाठी पात्र समजले जाईल.

३) भाषण तयारीचे असले तरी त्या भाषणाचा विषय विद्यार्थ्याने आकलन केलेला असला पाहीजे. केवळ पाठांतराचे प्रदर्शन अवांतर हावभाव व हालचाल याचा मिळणाऱ्या गुणांवर प्रतिकुल परिणाम होऊ शकतो याची नोंद घ्यावी.

४) स्पर्धकास फक्त एकाच विषयावर बोलता येईल.

( मागे पहा )

५) स्पर्धेसाठी अधिकृत फॉर्मवरच विद्यार्थ्यांची नावे मुख्याध्यापकांचे स्वाक्षरीने पाठविली पाहिजेत. प्रत्येकविद्यार्थ्यासाठी प्रवेश फी रु. १००/- (शंभर) राहील. प्रवेश फी रोखीने अथवा संस्थेच्या **बँक ऑफ बडोदा, शाखा-कराड खाते क्र. ३१०९०१०००००२२२४** (IFSC Code - BARB0KARADX) या खात्यावर भरण्यात यावी व फी भरल्याची पावती प्रवेशिके सोबत पाठवावी.

६) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

७) प्रथम तीन क्रमांकांना अनुक्रमे रु. ४,५०१/-, रु. ३,००१/- व रु. २,००१/- अशी रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे दिली जातील. तसेच उत्तेजनार्थ रोख रू. २५१/- ची ४ पारितोषिके दिली जातील.

८) प्रथम क्रमांक संपादन करणाऱ्या विद्यालयास कायम स्वरूपी स्मृतिचिन्ह दिले जाईल.

९) स्पर्धकांच्या संख्येनुसार व गुणवत्तेनुसार उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येतील.

१०) स्पर्धेसाठी यशवंत व्यासपीठाने वेळोवेळी ठरविलेले सर्व नियम स्पर्धकावर बंधनकारक राहतील.

११) प्रवेश पत्रिका वेळेतच आल्या पाहिजेत वेळेवर न पोहोचणाऱ्या प्रवेश पत्रिका रद्द ठरविल्या जातील व संबंधित स्पर्धकांना स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

१२) स्पर्धा टिळक हायस्कूल, कराड येथे होतील. स्पर्धेचे वेळापत्रक स्वतंत्ररित्या शाळेस कळविले जाईल.

१३) प्रवास, निवास, भोजन व इतर अनुषंगिक खर्च त्या त्या शाळेने करावयाचा आहे.

१४) स्पर्धेत सहभागी होणाऱ्या शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांचा पूर्ण तपशिल व प्रवेश पत्रिका दि. **३० सप्टेंबर २०२४** पर्यंत पाठवावी.

१५) स्पर्धेपूर्वी स्पर्धकाने आपल्या संबंधित शिक्षकासह दहा मिनिटे अगोदर स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित असले पाहिजे.

आपल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा व आपण तशी संधी त्यांना उपलब्ध करुन द्यावी ही विनंती.
आपल्या प्रवेश पत्रिका आल्यानंतर आपणास स्पर्धेची निश्चित तारीख व वेळ स्वतंत्र पत्राने कळविली जाईल.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता -**
**सेक्रेटरी,**
**शिक्षण मंडळ, कराड.**
प्रशासकीय कार्यालय -''कृष्णाकाठ'' फा. प्लॉट क्र. २२२,
मंगळवार पेठ, कराड. (जि. सातारा) ४१५११०.
फोन नं.- (०२१६४) २२३४०७
email : shikshanmandalkaradk@gmail.com

**चंद्रशेखर देशपांडे**
सेकेटरी
शिक्षण मंडळ, कराड.

Book -Post

**श्री.** ______________________________

______________________________

______________________________

**• प्रेषक •**

**सेक्रेटरी, शिक्षण मंडळ, कराड**

**पत्ता : ''कृष्णाकाठ'' फा. प्लॉट क्र. २२२, मंगळवार पेठ,**

**कराड. ४१५११०.(जि. सातारा)**

**महाराष्ट्र**